



## उपेक्षीतांचीही दिवाळी !





दिपोत्सव सर्वत्र मोठ्या हर्षोल्हासाने साजरा होत असतांना आजही समाजातील उपेक्षीत व दुर्लक्षीत घटक या उत्सवापासून वंचीत दिसतात. या उपेक्षीतांनाही या दिपोत्सवामध्ये सहभागी करण्यासाठी अवतार मेहेरबाबा बहुद्देशीय संस्थेचा पुढाकार प्रेरणादायी ठरला. संस्थेच्यावतीने दिवाळीच्या शुभपर्वावर सायंस्कोर मैदान व राजकमल चौक परिसरातील पारधी मुलांना दिवाळी फराळ व कपड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे सुरेशकाका ढोक, संजय सोनक, दिपाली चावंडे, साधना गुडधे, शिल्पा ढोक, संगीता भांबुरकर यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# हव्याप्र अभियांत्रिकी रासेयो विद्यार्थीनीची झेप...

## नागपुर येथे होणाऱ्या पूर्वपथसंचलनाकरीता एकमेव रासेयो विद्यार्थीनीची निवड

**अमरावती दि.६ :** २६ जानेवारी, देशाचा प्रजासत्ताक दिन. या दिवशी दिल्ली येथे देशाची संस्कृती व सैन्यशक्तीचा परिचय संबंध देशासहीत आंतरराष्ट्रीयस्तराला होतो. याचं एक आणखी वैशिष्ट म्हणजे सैन्यांद्वारे होणारे शिस्तबद्ध पथसंचलन. या पथसंचलनामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही संधी देण्यात येते. या पथसंचलनामध्ये विद्यार्थ्यांना सहभाग घेता यावा याकरीता नुकतेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे निवड प्रक्रीया पार पडली. या निवड प्रक्रीयेत हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाला सर्वोच्च बहूमान मिळाला असून रासेयो विभागाची विद्यार्थीनी अश्वती कैमल हिची विद्यापीठस्तरावर अभियांत्रिकी शाखून एकमेव निवड करण्यात आली आहे.

देशाच्या प्रजासत्ताक दिनाची तयारी सुरू झाली आहे. येत्या २६ जानेवारी २०१९ रोजी दिल्ली येथे देशाचा प्रजासत्ताक दिन मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी सैन्यांसोबतच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सुद्धा पथसंचलनामध्ये सहभाग व्हावा याकरीता विद्यापीठ स्तरावर पूर्वपथसंचलन निवड प्रक्रीया राबविण्यात येत आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे २९ ते ३० ऑगस्ट दरम्यान दोन दिवसीय निवड प्रक्रीयेचे आयोजन करण्यात आले होते. या निवड प्रक्रीयेत जवळपास दोनशे पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ज्यामध्ये हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थीनी अश्वती कैमल चा सहभाग होता. त्यानंतर दुसरी निवड प्रक्रीया सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे ७ ते ९ सप्टेंबर दरम्यान पार पडली. या निवड प्रक्रीयेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून केवळ पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली ज्यामध्ये अभियांत्रिकी शिक्षण शाखेतून एकमात्र हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रासेयो विभागाची विद्यार्थीनी अश्वती कैमल हीची निवड करण्यात आली आहे. पथसंचलनाकरीता अंतीम निवड प्रक्रीया राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ येथे दि.२५ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर दरम्यान होणार आहे. यांनतर या निवड प्रक्रीयेतून पात्र विद्यार्थ्यांना दिल्ली येथे साजरा होणाऱ्या प्रजासत्ताक दिनी पथसंचलन करण्याची सुवर्ण संधी लाभणार आहे.

या संबंध निवड प्रक्रीयेमध्ये हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रासेयो विभागाची विद्यार्थीनी अश्वती कैमल सतत यशस्वी झाली असुन पुढील यशाकरीता तीच्यावर हव्याप्र मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, मंडळाचे उपाध्यक्ष



व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. श्रीकांत चेंडके, मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, प्राचार्य डॉ. ए.बी मराठे, रजिस्ट्रार एस.व्ही ढोले, रासेयो समन्वयक प्रा. सतोष बंदे यांच्यासह सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांतर्फे शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अश्वती कैमल हीने आपल्या यशाचे श्रेय रासेयो विभागाचे समन्वयक प्रा. संतोष बंदे यांना दिले आहे.

## माजी विद्यार्थी गिरीष जोशी यांनी दिला दातृत्वाचा परिचय

अमरावती दि.६: बाल शिक्षण मंडळद्वारा संचालित आदर्श प्राथमिक शाळेचे माजी विद्यार्थी गिरीष जोशी (दुबई) यांनी आदर्श प्राथमिक शाळेला विजेचा सोलर सिस्टीमसाठी आर्थिक मदत केली. त्यानिमित्त संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. गिरीष जोशी हे दुबई स्थित अरब अमीरातीमध्ये कार्यरत आहेत. विद्यार्थी काळात शाळेचे आदर्श विद्यार्थी असलेल्या जोशी साहेबांनी आपल्या प्रयत्नांनी त्यांच्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. शाळेला सोलर सिस्टीम भेट देवून त्यांनी आपल्या दातृत्वाचा परिचय दिला. त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव संध्याताई मराठे होत्या. कार्यक्रमास संस्थेचे सर्व सभासद, शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहल विरूळकर तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. संस्थेच्या अध्यक्षा स्नेहलता महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## 'त्या' काळवीटाची शिकार वाघानेच केली?

### शिरखेड परिसरात चर्चा व अफवांना उधान



**नया वाठोडा, दि.६:** शिरखेड येथील शेत शिवारात काळविटाचा मृत्यू झाला व त्याला जनावरांने खाल्ला असल्याने गावात पुन्हा वाघ आल्याच्या अफवेने गावात चर्चेला उधान आले आहे.

शिर वनपरिक्षेत्रांतर्गत शिरखेड - लेहगाव मार्गावरील शेत शिवारातील विनोद गोमकाळे व वाघमारे यांच्या शेतातील मधातील धुऱ्यावर हिवरा खाली अंदाजे ७ ते ९ वर्षाचा असलेला काळविट मृता अवस्थेत आढळून आला. त्याने लगेच गावात माहिती देवून शिरखेड वनपरिक्षेत्राचे वनरक्षक रिना पवार आणि अरूण मडके घटना स्थळावर येवून त्याची पहाणी केली काळविटचा मागील भाग खालेला आढळून आला. त्याच्या अंगावर नखाने ओर पडल्याच्या खुना होत्या. काळविटच्या घटनास्थळावर गावातील अनेक लोकांनी धाव घेतली. कारण काही दिवसा अगोदर वाघ आल्याची घटना घडली होती. हे शिकार वाघाने तर केली नाही? वाघ पुन्हा आपल्या परिसरात तर आला नाही? या अफवेने पुन्हा जख्मा ताज्या झाल्या. वनरक्षक रिना पवार यांनी लोकांना अफवा फैलवू नका ही वाघाची शिकार नसून तडशा किंवा लांडगाची शिकार होवू शकते असे सांगून लोकांना शांत केले. सदर मृतक काळविटाचा पंचनामा करून त्याचे शवविच्छेदन करण्यात आले व त्या काळविटाला अग्नि देण्यात आली.

# दिवाळीच्या तोंडावर पांढऱ्या सोन्याने दिला दगा

## यंदा कपाशीच्या उत्पादनात घट



**नया वाठोडा, दि.६:** कपाशीच्या पहिल्या वेचणीला सुरूवात झाली आहे. या वेचनीवरून यंदा कपाशीच्या उत्पादनात लक्षणीय घट होणार असल्याचे स्पष्ट होत आहे. विविध नैसर्गिक संकटाचा फटका कपाशीला बसला असून, या पिकावर केलेला खर्चही वसूल होणे कठीण असल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्यांची दिवाळी ही दरवर्षी कापूस विकून साजरी होते. मात्र, यंदा कापसाची पहिल्याच वेचनीत उलंगवाडी झाली असल्याने व कापसाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने दिवाळीच्या तोंडावर पांढऱ्या सोन्याने शेतकऱ्यांना दगा दिला आहे.

कपाशीची शेती ही शेतकऱ्यांना परवडणारी राहिली नाही. कपाशीच्या पेरणीसह काढणीपर्यंत लागणाऱ्या खर्चात मोठी वाढ झाली असतांना बाजारात अपेक्षित दरही मिळत नाहीत. त्याशिवाय गतवर्षी या पिकावर बोंडअळीचा प्रार्दूभाव झाला. याच कारणामुळे शेतकऱ्यांनी यावर्षी कपाशीकडे पाठ फिरविली आहे. तरी शेतकरी नगदी पिक म्हणून कपाशीला प्रथम पंसती देतात. यंदा देखील मोर्शी तालुक्यात मोठ्या प्रमाणात कपाशीची पेरणी करण्यात आली नाही. पावसाने दगा दिल्याने कपाशी नसल्यात जमा असून ज्या शेतकऱ्यांनी पाणी दिले आहे. त्यांच्या घरात थोडा बहूत कापूस येणार आहे. मोर्शी तालुक्यात कपाशीच्या पहिल्या वेचणीला सुरूवात झाली आहे. वेचनीचे दर देखील पाच रुपये किलोप्रमाणे मजुरांना द्यावे लागत आहे. या वेचनीत कपाशीचे उत्पादन घटणार असल्याने दुसऱ्या वेचनीत कपाशीचे उत्पादन घटणार असल्याने दुसऱ्या वेचनीतच कपाशी पिकांची उलगवाडी शेतकऱ्यांना करावी लागणार आहे. त्यामुळे या पिकावर लागलेला खर्चही वसूल होण्याची शक्यता बहुतांश शेतकऱ्यांना राहिली आहे.

## मांजरखेडा (क) मराठी शाळा परिसर झाला तंबाखूमुक्त!



### तंबाखूमुक्त अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**चांदूर रेल्वे, दि.६:** तालुक्याला लागून असलेल्या अवघ्या पाच किलो मिटर अंतरावर असलेल्या मांजरखेडा कसबा येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी शाळा येथील शिक्षकांनी गावातील युवकांचे प्रबोधन करीत शाळेचा परिसर तंबाखू मुक्त करता येईल याकरीता विविध उपक्रमाचे आयोजन केले जात आहे.

केंद्र सरकारच्या २००३ तंबाखू नियंत्रण कायदा अन्वये या शाळेतील शिक्षकांनी गावालगतचा परिसर तंबाखू मुक्त करण्याचा निर्धार केला होता. त्याकरीता त्यांनी प्रथम तंबाखू मुक्त अभियानांतर्गत ११ निकषांचा अभ्यास करून नियोजन केले. त्यानुसार त्यांनी गावात युवकांना प्रबोधन करण्यासाठी प्रथम प्रभातफेरी काढून गावात जनजागृती केली. शालेय परिसरात तंबाखू मुक्त क्षेत्र, तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस बंदी आदी उपाययोजना केली. यासह शाळेतील विद्यार्थ्यांना तंबाखुच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन केले. तसेच तंबाखु मुक्त समिती स्थापन करत गावकऱ्यांना उद्बोधन करण्यात आले. तंबाखु मुक्तीचा घरोघरी प्रसार व्हावा म्हणून शाळेत दंत रोग तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबिराकरीता डॉ. महेक अनिल अग्रवाल व डॉ.अदिती अनिल अग्रवाल यांनी शाळेतील १६५ विद्यार्थ्यांची उत्कृष्टपणे तपासणी केली. जया विद्यार्थ्यांच्या दातांना विशेष तपासणीची गरज आहे त्यांना सावंगी मेघे पाठविण्याचा सल्ला दिला. यानंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या दप्तरावर, पेटीवर, वहीवर सामाजिक संदेश देण्यात आले. शिक्षकांच्या हाकेला पालकांनी सकारात्मक प्रतिसाद देत शाळा परिसर तांबखू मुक्त झाला. ९ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद मराठी शाळा मांजरखेडा कसबा परिसर तंबाखू मुक्त घोषित करण्यात आला. याकरीता तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अशोक इंगळे, विस्तार अधिकारी सदाशिव दाभाडे, छबुताई जाधव, केंद्र प्रमुख वंदना शेळके, सहाब शेख, सरपंच दिलीप गुल्हाने यांनी शाळेचे मुख्याध्यापक पुष्पराज हुमते, सहाय्यक शिक्षक संजय मोदी, संजय शेलोकर, अनिल भरोसे, मिना किन्हीकर, माधुरी बुटे, आंबटकर शाळा व्यावस्थापन समिती अध्यक्ष अरुण कावलकर यांचे अभिनंदन केले.




# आता आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण थांबणार नाही : डॉ. नयना कडू

**आसेगाव पूर्णा, दि.६:** ग्रामीण भागामध्ये विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणीमुळे उच्च शिक्षण घेता येवू शकत नाही. त्यामुळे महाविद्यालयातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता यावर्षी पासून संस्थेच्या माध्यमातून शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली. या पुढेही जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आर्थिक मदत म्हणून शिष्यवृत्ती देण्याचा मानस व्यक्त करते. तेव्हा आता आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण थांबणार नाही. असे प्रतिपादन मराठी विभाग प्रमुख छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णाच्या डॉ. नयना कडू यांनी केले.

त्या छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पूर्णा येथे सत्र २०१८-१९ पासून महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवंता परंतु आर्थिक दुर्बल असलेल्या विद्यार्थीनीसाठी श्रीमती इंदिराबाई बाबाराव कडू यांच्या दाननिधीमधून व स्वतःच्या संकल्पनेतून आणि स्व. शितल बाबासाहेब कडू स्मृती प्रेरणा शिष्यवृत्ती योजनेच्या शुभारंभ व शिष्यवृत्ती प्रदान सोहळा नुकताच महाविद्यालयात संपन्न झालेल्या सोहळ्यात प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान संस्थेच्या कोषाध्यक्ष माधवीताई वडतकर यांनी भूषविले होते. तर प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुवर्णा जवंजाळ तसेच पत्रकार किशोर मोकलकर उपस्थित होते. तर सोहळ्याला प्रमुख वक्त्या म्हणून डॉ.नयना कडू उपस्थित होत्या. या संपन्न झालेल्या सोहळ्यात एकूण आठ विद्यार्थीनीला प्रत्येकी २५०० रु. रक्कमेच्या चेकचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. नयना कडू पुढे म्हणाल्या आपल्या भविष्याची वाटचाल या महाविद्यालयातील विद्यार्थीनींना यशस्वीरित्या करता यावी या भावनेतून माझ्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेली ही शिष्यवृत्ती यापुढे निरंतर चालू राहील असल्याच्या त्या म्हणाल्या. तसेच हे महाविद्यालय शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी समाजाच्या मागे सदैव राहील.

त्यांच्या पाल्यांना आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणाचा कोणताही प्रकारचा खंड पडू देणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.मनोज सपकाळ यांनी केले तर संचालन गौरवी गुळसुंदरे हिने केले. कार्यक्रमाचे आभार



प्रा.वनिता चौधरी यांनी मानले. सोहळ्याला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# मोर्शी तालुक्यात ग्रामीण भागात उघड्यावरील हागणदारी जैसे थे

**नया वाठोडा दि.६:** केंद्र शासनाने स्वच्छ भारत मिशन राबवून गाव स्वच्छ तर देश स्वच्छ होईल. याकरीता ग्रामीण भागात घरोघरी स्वच्छालय बांधण्याकरीता व त्याचा नियमित वापर होवून महिलांसह पुरूषांना त्याचा वापर करून गावाभोवताल होणारी घाण कमी व्हावी या ग्रामीण भागातील आरोग्य अबाधीत राहावे, या करीता शासनाच्या वतीने शासकीय अनुदान दिले. परंतु काही शेतमजूर वर्गांना त्या अनुदानाच्या पैशात स्वच्छालय बांधणे शक्य होत नसल्यामुळे प्रत्येक घरी स्वच्छालय व्हावेत या उद्देशाने नव-नवीन कल्पना लढवून कमी खर्चात स्वच्छालय कसे होईल याकरीता शक्कल लढवून कंत्राटदारांनी गोरगरीबांना स्वच्छालये बांधून दिले. कारण स्वच्छालयाची सवय ग्रामस्थांना व्हावी. त्याच प्रमाणे महिला वर्गांना उघड्यावर स्वच्छालयाकरीता जाण्याची पाळी येवू नये. सुरूवातीला सकाळीच गुडमॉर्निंगमध्ये एक प्रकारे भिती निर्माण केली. परंतु आता काय घरोघरी स्वच्छालय तयार झाले व गुडमॉर्निंग पथफेरी बंद झालीत. स्वच्छालये ही घरोघरी झाली, पण खरोखरच त्याचा वापर होतो का? फक्त सुज्ञ लोकच त्याचा वापर करीत आहेत, बाकी ज्यांना उघड्यावर शौच्छास जाण्याची सवय आहे. त्यांची सवय अद्यापही मोडलेली नाही. एवढेच काय पण घरी शौच्छालय असूनही महिला वर्गही उघड्यावरच शौच्छास जाताना दिसतात. याचा पुरावा गावाबाहेरील पांदण रस्ते पाहिल्यावर मिळतोच. गाव स्वच्छ व्हावे, जनतेचे आरोग्य चांगले व्हावे याकरीता शासनाने प्रयत्न केले. पण त्याचा उपयोग काय? शेवटी गावाबाहेर घाणीचे साम्राज्य कायमच. रस्त्याने जातांना शेतमजूर शेतकऱ्यांना जे उघड्यावर बसतात त्यांनाही जावे तर लागते. गावात शौच्छालय तर झाले पण त्याचा नियमित वापर व्हावा याकरीता पूर्वीच्या गुडमॉर्निंग पथकाला सक्रिय होण्याची आवश्यकता नक्कीच आहे किंवा ग्रामपंचायत स्तरावर एखादी कमेची नेमून त्यांच्याकडून तरी या उघड्यावर जाणाऱ्यांवर अंकुश लावणे आवश्यक झाले आहे.